# जाहिरात विश्वातील साक्षरता या विषयावर केशव साठये यांचे भाषण




आज आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन निमित्त जाहिरातविश्वातील साक्षरता या विषययावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील मास कॉम च्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला . जाहिराती मध्ये नेमके काय सांगायचे आहे याची साक्षरता दृश्यलिपी जाणून घेण्याची समज, आशायावर चित्र वा ध्वनि मात करणार नाही यांची काळजी घेण्याची साक्षरता असे अनेक मुद्दे मांडत मी त्यांना साक्षरतेचे नवे आयाम दाखवण्याचा प्रयत्न केला. मोजके जाहिरातपट दाखवत त्यांना एखादी वस्तू वा सेवा विकण्यासाठी संकल्पना कशी विकसित करायची याची उदाहरणे दिली. तंत्रज्ञानाचा नेमका उपयोग करत जाहिरातीची गोष्ट कशी करायची हे समजले की या क्षेत्रातील निम्मी लढाई जिंकल्यात जमा आहे हा विश्वास विद्यार्थ्यांना यातून आला तर या जाहिरात विश्वात ते नक्की काही भरीव करु शकतील हा विश्वास आहे .